**नियमीत दिवाणी दावा क्र.६७७/२०१२**

(CNR : MHSN050021262012)

## नि.६५ व ७० वरील आदेश

१. वादींनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६, नियम १७ व कलम १५१, १५२ नुसार दाखल केला आहे. वादींनी असे म्हणणे सादर केले की वादींनी त्यांचे मिळकतीत प्रतिवादींनी केलेल्या अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. त्यामुळे वादी व प्रतिवादी यांचे गटाचे एकत्रीत मोजणी होऊन हद्द निश्चित होणे आवश्यक आहे. यापुर्वी वादी व प्रतिवादींच्या मिळकतीची मोजणी मो.र. नं.१७४ व निमताना मोजणी मो.र.नं.१००/२०१८ नुसार झालेली आहे. परंतु त्या पुर्वीच्या मोजणीमध्ये तफावत असल्याने वरीष्ठ कार्यालयातून मोजणी होऊन मिळण्यासाठी वादीने नि.६५ ला अर्ज दाखल केला होता व तो दिनांक २४/१/२०२२ रोजी मंजूर झाला आहे. परंतु नि.६५ मध्ये नजरचुकीने सदरची मोजणी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली यांचे ऐवजी 'जिल्हा निरीक्षकसो भूमि अभिलेख, सांगली' यांची नेमणूक करावी असे नमूद केले आहे. म्हणून त्यांनी नि.६५ मध्ये त्याप्रमाणे दुरुस्ती करण्याची विनंती वादींनी केली आहे.

२. सदरच्या अर्जास प्रतिवादींचे म्हणणे मागविण्यात आले. प्रतिवादींनी असे म्हणणे सादर केले की सदर नि.६५ चे अर्जास दुरुस्ती मागता येणार नाही म्हणून अर्ज नामंजूर करण्यात यावा.

३. दोन्ही पक्षांचे म्हणणे लक्षात घेऊन मी अभिलेखाचे अवलोकन केले. अभिलेखावरुन असे दिसून येते की नि.६५ वरील आदेशानुसार जिल्हा निरीक्षक, भूमि अभिलेख, सांगली यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. सदर नि.क्र.६५ वरील आदेशानुसार सदरचे प्रकरण जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली यांचेकडे पाठविल्यानंतर त्यांनी ते नि.६८-अ वरील पत्रानुसार या

न्यायालयाकडे परत पाठविले आहे. त्या पत्रामध्ये त्यांनी असे कळविले आहे की 'जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, सांगली' असे कार्यालय अस्तित्वात नसून जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली असे कार्यालय आहे म्हणून त्यांनी विनंती केली की नि.६५ मध्ये 'जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख, सांगली' ऐवजी 'जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली' असे बदल करुन पाठविणे उचित होईल.

४. सदर पत्रावरुन असे दिसून येते की, जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख असे कोणतेही कार्यालय नाही त्यामुळे त्या कार्यालयाने सदरचे प्रकरण परत पाठविले आहे. वादींनी पूर्वीच्या दोन्ही मोजणींमध्ये तफावत असल्याने पुन्हा वरीष्ठ कार्यालयामार्फत मोजणी होण्यासाठी नि.क्र.६५ नुसार अर्ज केला आहे. सदरचे पूर्वीच्या अधिका-यांनी केलेल्या मोजणीच्यापेक्षा वरीष्ठ अधिका-यांच्या मोजणी करण्याची त्या अर्जामध्ये विनंती करण्यात आली आहे. परंतु, जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख्, सांगली असे वरीष्ठ कार्यालय नसल्यामुळे सदरचे पाठविलेले प्रकरण परत पाठविण्यात आले आहे व संबंधीत कार्यालयाने आदेशामध्ये योग्य ती दुरुस्ती सुध्दा सुचविलेली आहे. अर्जदाराने त्याचे अर्जामध्ये कार्यालयाचे नाव चुकीचे नमूद केले असल्यामुळे तसेच नाव आदेशामध्ये सुध्दा नमूद करण्यात आले आहे. वादीने वरीष्ठ कार्यालयाकडून मोजणी करण्यासाठी नि.क्र.६५ वर अर्ज दिल्याने त्या अर्जानुसार योग्य त्या वरीष्ठ कार्यालयाची नेमणूक न्यायालयीन आयुक्त म्हणून होणे आवश्यक आहे. त्यामुळे नि.क्र.६५ वरील आदेशामध्ये नमूद न्यायालयीन आयुक्त यांच्या ऐवजी जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, सांगली यांची नेमणूक करणे न्यायोचित होईल. म्हणून मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. न्यायालयीन आयुक्त म्हणून 'जिल्हा निरीक्षक भूमि अभिलेख, सांगली' यांच्या ऐवजी '**जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली** यांची नेमणूक करण्यात येत आहे.

२. वादीने सात दिवसांमध्ये जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, सांगली यांचे कार्यालयात मोजणी शुल्क जमा करुन त्या पावतीची छायांकित प्रत या न्यायालयात पुढील तारखेस दाखल करावी.

३. सदर न्यायालयीन आयुक्त यांना कमीशन रिट पुन्हा जारी करण्यात यावे.

येणेप्रमाणे नि.क्र.७० वरील अर्ज निकाली कारण्यात येत आहे.

VITTHAL G CHAUKHANDE

Digitally signed by VITTHAL G CHAUKHANDE
Date: 2022.11.16 11:50:05 +0530

इस्लामपूर (वि. ग. चौखंडे)

दिनांक १४/११/२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, इस्लामपूर

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this P.D.F. file order/Judgment are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. A. Desai |
| Court | : | Jt. Civil Court Sr.Dn.Islampur |
| Date of Order/Judgment | : | 14/11/2022 |
| Signed on | : | 14/11/2022 |
| Uploaded on | : | 16/11/2022 |